**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश रामचंद्र पाटील
मु.पो.पुणदी तर्फे तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८+२८२ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.८.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.सुरेश रामचंद्र पाटील
मु.पो.पुणदी तर्फे तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली श्री.द.ब.कवितके

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली श्री.व्ही.ए.दळवी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.११.२००६(अ.क्र.२८२/१४८) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.१.२००७(अ.क्र.२८२/१४८) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१.२००७(अ.क्र.२८२/१४८) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००७(अ.क्र.२८२)<br>दि. २०.२.२००७(अ.क्र.१४८) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अ.क्र.२८२+१४८-<br>पणदी तर्फे तासगाव येथील सरकारी गायरान ग.नं.६२६ मधील प्लॉटधारकांची यादी, मंजुरीच्या आदेशाची प्रत, प्लॉटच्या नकाशाची प्रत, गावात जाण्यासाठी व मुख्य रस्त्यास जाण्यासाठी असलेल्या रस्त्याची माहिती. | |

## विवेचन

सरकारी गायरानातील प्लॉटधारकांची यादी व त्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती आढळ होत नसल्याच्या कारणावरुन देण्यात आली नाही. अभिलेख कक्षात ही माहिती आहे. तसेच जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, सांगली यांचे त्याचा नकाशा असल्याचे पत्र आहे. अशा स्थितीत ही माहिती नाकारली कशी जाते, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.सुरेश रामचंद्र पाटील यांनी केली.

कार्यालयीन अभिलेखाचा शोध घेण्यात आला, परंतु ही माहिती मिळाली नाही. मात्र फेरफार क्र.१६९२ ने भूखंड वाटप केल्याची नोंद आढळून आली असून त्याची प्रत श्री.पाटील यांना देण्यात आली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.व्ही.ए.पाटील व अपिलीय प्राधिकारी श्री.द.ब.कवितके यांनी संबंधित फेरफाराच्या उताऱ्याच्या प्रतीसह नमूद केले. तसेच श्री.पाटील यांना ज्या कारणासाठी माहिती आवश्यक आहे, तो मूळ प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक महिना मुदत मिळावी, अशी विनंती तहसीलदार, तासगाव श्री.द.ब.कवितके यांनी लेखी व तोंडी केली. आयोगाने ती मान्य केली. परंतु यानुसार माहिती व प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही झाली नसल्याची तक्रार श्री.पाटील यांनी दि.५.१.२००९ च्या निवेदनाद्वारे आयोगाकडे

केली. तत्कालीन तहसीलदार श्री.द.ब.कवितके यांनी याबाबतचा अहवाल आयोगाला त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.सुरेश पाटील यांचा मूळ प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने व कागदपत्रांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन तहसीलदार श्री.द.ब.कवितके यांनी दि.३०.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करुन त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

पुणे
दि. २१ .१०.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(बिजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश रामचंद्र पाटील
मु.पो.पुणदी तर्फे तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८+२८२ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश रामचंद्र पाटील
मु.पो.पुणदी तर्फे तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली श्री.द.ब.कवितके

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तासगाव,
तासगाव तहसील कार्यालय, जि.सांगली श्री.व्ही.ए.दळवी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.११.२००६(अ.क्र.२८२/१४८) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.१.२००७(अ.क्र.२८२/१४८) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१.२००७(अ.क्र.२८२/१४८) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००७(अ.क्र.२८२)<br>दि. २०.२.२००७(अ.क्र.१४८) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अ.क्र.२८२+१४८-<br>पणदी तर्फे तासगाव येथील सरकारी गायरान ग.नं.६२६ मधील प्लॉटधारकांची यादी, मंजुरीच्या आदेशाची प्रत, प्लॉटच्या नकाशाची प्रत, गावात जाण्यासाठी व मुख्य रस्त्यास जाण्यासाठी असलेल्या रस्त्याची माहिती. | |

## विवेचन

सरकारी गायरानातील प्लॉटधारकांची यादी व त्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती आढळ होत नसल्याच्या कारणावरुन देण्यात आली नाही. अभिलेख कक्षात ही माहिती आहे. तसेच जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, सांगली यांचे त्याचा नकाशा असल्याचे पत्र आहे. अशा स्थितीत ही माहिती नाकारली कशी जाते, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.सुरेश रामचंद्र पाटील यांनी केली.

कार्यालयीन अभिलेखाचा शोध घेण्यात आला, परंतु ही माहिती मिळाली नाही. मात्र फेरफार क्र.१६९२ ने भूखंड वाटप केल्याची नोंद आढळून आली असून त्याची प्रत श्री.पाटील यांना देण्यात आली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.व्ही.ए.पाटील व अपिलीय प्राधिकारी श्री.द.ब.कवितके यांनी संबंधित फेरफाराच्या उताऱ्याच्या प्रतीसह नमूद केले. तसेच श्री.पाटील यांना ज्या कारणासाठी माहिती आवश्यक आहे, तो मूळ प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक महिना मुदत मिळावी, अशी विनंती तहसीलदार, तासगाव श्री.द.ब.कवितके यांनी लेखी व तोंडी केली. आयोगाने ती मान्य केली. परंतु यानुसार माहिती व प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही झाली नसल्याची तक्रार श्री.पाटील यांनी दि.५.१.२००९ च्या निवेदनाद्वारे आयोगाकडे

केली. तत्कालीन तहसीलदार श्री.द.ब.कवितके यांनी याबाबतचा अहवाल आयोगाला त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.सुरेश पाटील यांचा मूळ प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने व कागदपत्रांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन तहसीलदार श्री.द.ब.कवितके यांनी दि.३०.१०.२००९ पर्यंत आयोगाला सादर करुन त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

पुणे
दि. २१.१०.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सचिन भानुदास गोडांबे
धावडे आळी, गोडांबे वाडा, भोसरी, पुणे-३९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती व विधी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८२ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता अपीलकर्ता** श्री.सचिन भानुदास गोडांबे
धावडे आळी, गोडांबे वाडा, भोसरी, पुणे-३९
**जन माहिती अधिकारी** तथा माहिती व विधी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४ तत्कालीन-श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.११.२००७, दि.१४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्रीमती डी.व्ही.हर्डीकर यांच्या शैक्षणिक पात्रतेसह पाच मुद्दयांची माहिती आपण मागितली होती. ती विलंबाने व अपुरी मिळाली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा माहिती व विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे यांचे उत्तर योग्य ठरवून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे डॉ.वसंत काळपांडे यांनी आपले अपील फेटाळले, त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सचिन भानुदास गोडांबे यांनी केली.

श्रीमती हर्डीकर यांना शैक्षणिक पदवी (बी.एड.) नसताना विशेषाधिकारी (इंग्रजी) या पदावर नियुक्त करण्यात आले आहे. या प्रकाराची चौकशी करण्याचे आदेश देऊन दोषींवरती कडक कारवाई करण्यात यावी. मुद्दा क्र.३ मध्ये दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. मुद्दा क्र.४ व ५ मध्ये सरळसरळ आर्थिक गैरव्यवहार दर्शविणारी ही दोन उत्तरे असून माहिती देण्याच्या अपवादांचा गैरवापर करुन नाकारण्यात आली आहेत, असे प्रतिपादन श्री.गोडांबे यांनी केले.

श्री.गोडांबे यांनी मागितलेली माहिती संकलित करुन आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह आपल्या विभागाकडे पाठविण्याच्या सूचना मंडळातील सर्व संबंधित विभागप्रमुखांना देण्यात आल्या. माहिती संकलित करुन द्यावयाची असल्यामुळे तीस दिवसांच्या कालावधीत देणे शक्य होणार नाही, असे अपीलकर्त्यास कळविले, त्यानंतर दि.१४.१२.२००७ रोजी मुद्देनिहाय उत्तर देण्यात आले, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे यांनी नमूद केले. मुद्दा क्र.४ व ५ च्या संदर्भातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ मधील १(ङ) व (ज) मधील तरतुदीनुसार नाकारली [(ङ)जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती

व्यतिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती; (ञ)ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती;] हा आपण लावलेला अन्वयार्थ आहे. माहिती लपविण्याचा त्यामागे उद्देश नाही, असे प्रतिपादन श्री.बोबडे यांनी केले. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.श्रीरंग शंकरराव बोबडे व अपिलीय प्राधिकारी डॉ.वसंत काळपांडे यांनी लावलेला हा अन्वयार्थ चुकीचा आहे, असे प्रतिपादन श्री.गोडांबे यांनी केले, ते रास्त आहे. मंत्र्यांना उपलब्ध करुन दिलेल्या अधिकृत सेवेविषयीची माहिती विश्वासाश्रित संबंधांवर आधारित अथवा सार्वजनिक हिताशी संबंध नसलेली अशी मानता येणार नाही. म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे यांनी याबाबतचा तपशील तीन दिवसांत श्री.गोडांबे यांना पूरक कागदपत्रांसह द्यावा. तसेच मुद्दा क्र.३ बाबत कालावधी व अधिकारी यांचा तपशील आपण नंतर कळवू असे श्री.गोडांबे यांनी नमूद केले असून, तो तपशील पुरविल्यापासून तीन दिवसांत माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या आदेशानुसार संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे यांनी वाहनांच्या लॉगबुकाच्या संबंधित प्रतीसह माहिती दि.२३.१०.२००८ च्या पत्रान्वये श्री.गोडांबे यांना दिली व त्याची प्रत आयोगास सादर केली.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७ .१०.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. माणिक आनंदा चौगुले
मु. पो. जाखले, ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रभारी अप्पर निबंधक,
सहकारी संस्था (तपासणी व निवडणूक), महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विक्री व विशेष वसूली अधिकारी,
श्री. वसंतराव चौगुले नागरी सहाकारी पतसंस्था मर्यादीत,
५३२, ई वार्ड, शाहूपूरी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९० / २००९ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.०२.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.०४.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.०६.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव कशाच्या आधारे प्रसिध्द केला? तारण गहाण खत, दिवाणी न्यायालयाचा जप्ती आदेश, खर्च रिपोर्ट, प्लॅन एस्टिमेशन व संमतीपत्र यांची नक्कल. | |

*(कृ. मा. प.)*

## विवेचन

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६ /२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती अपीलकर्त्यांने मागितल्यास देणे बंधनकारक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६-१० -२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अशोक नारायण कुलकर्णी
अक्षय प्लास्टिक कारखान्याजवळ,
मु.पो.इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता (कोप)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
परिमंडल कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (अउदा)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१२/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१०.२००८ |

३. **उपस्थित -** श्री. अशोक नारायण कुलकर्णी
अक्षय प्लास्टिक कारखान्याजवळ,
मु.पो.इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता (कोप)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
परिमंडल कार्यालय, कोल्हापूर श्री. आर. जी. बुंदिले

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (अउदा)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर तर्फे कार्यकारी अभियंता
श्री. शशिकांत मधुकर बाकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अधीक्षक अभियंता, अतिउच्चदाब, पुणे यांनी केलेल्या बेकायदेशीर बडतर्फीच्या कार्यवाहीबाबत केलेल्या अपिलाची सुनावणी न केल्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता अनुपस्थित होते.

वीज मंडळातून केलेली आपली बडतर्फी बेकायदेशीर असून त्याविरूध्द आपण केलेल्या अपिलाचा निर्णय अद्याप का दिला नाही, याचे योग्य उत्तर आपल्याला दिले जात नाही. आपण नियमानुसार योग्य पध्दतीने अपील केलेले नसल्याचे उत्तर आपल्याला दिले, ते खोटे आहे, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अशोक नारायण कुलकर्णी यांनी केले आहे.

श्री. कुलकर्णी यांनी अनेक मुद्दयांची माहिती मागितली असून त्यातील मुख्य मुद्दा त्यांच्या बडतर्फी विरूध्दच्या अपिलाचा निर्णय का दिला नाही व त्याची कारणे काय आहेत, हा आहे. त्याबाबत वेळोवेळी त्यांना कळविण्यात आले आहे. बदलीच्या जागी कामावर हजर नसल्यामुळे व तत्सम कारणामुळे बदली आदेशापासून तीन वर्षांनी त्यांना बडतर्फ करण्यात आले. त्यांनी केलेले अपील नियमानुसार नाही. त्यामुळे त्यावर व त्याविषयीच्या त्यांच्या स्मरणपत्रांवर निर्णय देण्यात आला नाही, असेही त्यांना कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (अउदा ) श्री. शशिकांत मधुकर बाकरे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, (कोप ) श्री. आर. जी. बुदिले यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे हे म्हणणे कायदेशीर नाही. अधीक्षक अभियंता, पुणे यांच्या कार्यक्षेत्रात आपण काम करीत नव्हतो व त्यांच्याकडे कामावर हजर झालेलो नव्हतो. त्यामुळे त्यांच्यामार्फत अपील पाठविणे कायद्याने आवश्यक नाही, म्हणून मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडल कार्यालय, कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडे थेट मार्गाने अपील पाठविण्यात आले आहे. तसा खुलासा मुख्य अभियंता यांना अनेकदा केला आहे.

तरीही वारंवार तेच कारण सांगितले जात आहे, असे श्री. कुलकर्णी यांनी आयोगाला सादर केलेल्या विविध निवेदनांमध्ये म्हटले आहे. परंतु बडतर्फीविषयी त्यांनी केलेले अपील नियमानुसार आहे की नाही, हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कायदेशीर बाबीविषयक भाग आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा निर्णय होऊ शकत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे -४११ ००१

श्री. पांडुरंग नामदेव शिंदे
मु.पो.टेंभू, ता. कराड, जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१ शाखा ओगलेवाडी, ता.कराड, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** डायरेक्टर,
टेंभू पॉवर प्रायव्हेट लि. पुणे, मु.पो.टेंभू, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१५२/२००९/सातारा** |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/१०/२००८, दि.१/४/२००९ व दि. ३/३/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/३/२००९ व दि.१८/४/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/५/२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** टेंभू पॉवर प्रायव्हेट लि.कंपनीच्या जमीन संपादनासाठीच्या खर्चाची करार पत्रके, चलने व अकौंट बुकच्या प्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. पांडुरंग नामदेव शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील हे ज्या संस्थेविरुध्द दाखल केलेले आहे ती टेंभू पॉवर प्रायव्हेट लि. ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मधील व्याखेनुसार 'सार्वजनिक प्राधिकारण' ठरत असल्याचे पुरावे अपीलकर्त्याने सादर

केलेले नाहीत. तसेच, अपीलकर्त्याने वेगवेगळया ३ माहिती-मागणी अर्जांसाठी आयोगाकडे एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक माहिती-मागणी अर्जांसाठी आयोगाकडे स्वतंत्रपणे अपील करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**स्थळ** : पुणे
**दिनांक** : ३१ / १० /२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुनिल भिमराव करजगीकर
अे. १३, आसरा गृहनिर्माण संस्था (मर्या.)
आसरा नगर, होडगी रोड, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर **उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५४/२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.२.२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.५.२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.६.२००८ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.) या संदर्भातील प्रश्नार्थक स्वरूपाची तसेच प्रस्तावित कार्यवाहीबाबतची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिल भिमराव करजगीकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द ९० दिवसांच्या कालावधीत राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करता येईल, अशी तरतूद असून अपीलकर्ता श्री. करजगीकर यांनी आयोगाकडे दाखल केलेले अपील मुदतबाहय आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

प्रा.सदाशिव रामभाऊ तिडके
महात्मा फुले मार्ग, हनुमान मंदीर रोड, शाहूनगर, बीड **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** संचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप संचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** संचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर डॉ.चंद्रशेखर जनार्दन भोंडे

**जन माहिती अधिकारी तथा** उप संचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर श्री.सतीश हणमंतराव बागल

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.०१.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.०२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.०४.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.११.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>१) डॉ.व्ही.आर.तिडके, सेवानिवृत्त जिल्हा क्षयरोग अधिकारी वर्ग-१, कोल्हापूर यांची पेन्शन मंजूर झाली आहे काय? असल्यास कधी व नसल्यास का मंजूर झाली नाही?<br>२) डॉ.तिडके यांना दि.०१.०१.१९८२ पासून वेतनवाढी व थकित बिले देण्यात आली आहेत काय? असल्यास कधी व नसल्यास का देण्यात आली नाहीत, याची आदेशांच्या प्रतीसह लेखी माहिती |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

डॉ.व्ही.आर.तिडके, सेवानिवृत्त जिल्हा क्षयरोग अधिकारी, वर्ग-१, कोल्हापूर यांचे सेवानिवृत्ती वेतन, वेतनवाढी व थकित बिले या संदर्भातील माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली जात आहे. सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देण्याबाबतच्या शासन निर्णयांचे व आदेशांचे पालन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेले नाही. सेवापुस्तक परिपूर्ण तयार केलेले नाही. उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांची ती जबाबदारी होती, परंतु त्यांनी ती पार पाडलेली नाही. त्यामुळे डॉ.तिडके यांना आर्थिक लाभापासून वंचित रहावे लागत असून अन्याय होत आहे, अशी तक्रार प्रा.सदाशिव रामभाऊ तिडके यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

सहसचिव, वित्त यांनी सेवापुस्तकाबाबत काढलेल्या आदेशांचे पालन न करणे, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीतील त्रुटी, आपले सेवापुस्तक आपल्यालाच तयार करण्यास सांगण्याच्या वरिष्ठांच्या अयोग्य सूचना आदी मुद्दे डॉ.तिडके यांनी व्यापक पत्रव्यवहारात उपस्थित केले असून, त्या कागदपत्रांसह तशाच स्वरुपाचे प्रतिपादन अपीलकर्ता प्रा.तिडके यांनी केले आहे.

प्रा.तिडके यांच्या अर्जानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्यांना विहित मुदतीत पुरविण्यात आली. डॉ.तिडके यांनाही वेळोवेळी त्याबाबत कळविण्यात आले. डॉ.तिडके हे स्वतः

कार्यालयप्रमुख होते. त्यामुळे स्वतःचे सेवापुस्तक पूर्ण करण्याची त्यांचीही जबाबदारी होती. परंतु याबाबत त्यांनी सहकार्य दिलेले नाही. दि.२७.१२.१९९६ पासूनच्या कागदपत्रांवरुन कोल्हापूरमधील त्यांच्या सेवेचे पुस्तक तयार केले. परंतु त्या आधी जालना, बीड, गडचिरोली आदी ठिकाणी केलेल्या कामाबाबतची माहिती त्यांनी स्वतः देणे आवश्यक होते. तरीही त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांशी वारंवार पत्रव्यवहार करुन, तसेच उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर या कार्यालयातर्फे कर्मचारी पाठवून तेथील सेवापुस्तक प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आला, असे जन माहिती अधिकारी श्री.सतीश हणमंतराव बागल यांनी पूरक कागदपत्रांसह विस्ताराने नमूद केले. डॉ.तिडके यांना दि.३१.७.२००७ अन्वये तात्पुरते सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच दुय्यम सेवापुस्तकाद्वारे अन्य लाभांबाबतही प्रशासकीय कार्यवाही चालू असून त्याची माहितीही डॉ.तिडके व त्यांचे बंधू अपीलकर्ता प्रा.तिडके यांना वेळोवेळी देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.सतीश हणमंतराव बागल व अपिलीय प्राधिकारी डॉ.चंद्रशेखर जनार्दन भोंडे यांनी लेखी व तोंडी विस्ताराने नमूद केले. डॉ.तिडके यांना देण्यात आलेले धनादेश, दुय्यम सेवापुस्तक तयार करण्याबाबत केलेली कार्यवाही, सेवानिवृत्तीनंतरचे विविध लाभ त्यांना मिळावेत यासाठी केलेला पत्रव्यवहार व प्रयत्न आदींची तपशिलवार माहिती जन माहिती अधिकारी श्री.सतीश हणमंतराव बागल व अपिलीय प्राधिकारी डॉ.चंद्रशेखर जनार्दन भोंडे यांनी लेखी निवेदनाद्वारे सादर केली. याच विषयात डॉ.तिडके अथवा त्यांचे निकटचे नातेवाईक सातत्याने पत्रव्यवहार, अर्ज व अपिले करीत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. तसेच या अनुषंगाने श्रीमती शोभा सदाशिवराव तिडके, रा.बीड यांनी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे केलेल्या अपिलाच्या निर्णयाचाही उल्लेख त्यांनी केला.

एकाच विषयाबाबत डॉ.तिडके अथवा त्यांचे निकटवर्ती विविध पातळ्यांवर सातत्याने पत्रव्यवहार, विविध प्रकारचे अर्ज व अपिले करीत आहेत. त्याच मागणीसाठी आयोगाच्या वेगवेगळ्या खंडपीठांकडेही ते अपिले करीत असल्याचे स्पष्ट होते. वस्तुतः सर्व माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. त्यांनी उपस्थित केलेले अन्य मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीविषयक

आहेत. वरिष्ठांनी योग्य कार्यवाही केली की नाही याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. त्यासाठी अपीलकर्त्यांने सर्व यंत्रणांचा वेळ व श्रम अकारण वाया घालवू नयेत, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि. ५ .१०.२००९